CIDCO
WE MAKE CITIES
प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
सिडको
शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. १५/१०/२०२०**

## सिडको गृहनिर्माण योजनेतील यशस्वी अर्जदारांना हफ्ते भरण्यास मुदतीवाढीसोबतच हफ्त्यांवरील विलंब शुल्क माफ

सिडको गृहनिर्माण योजना २०१८ मधील यशस्वी अर्जदारांना घरांचे हफ्ते भरण्यास २८ डिसेंबर २०२० पर्यंत मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सिडको महामंडळाने घेतला आहे. कोविड-१९ व त्या अनुषंगाने सुरू असलेल्या टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे अंदाजे २००० कुटुंबांना त्यांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्याची पुनःश्च संधी प्राप्त झाली आहे.

कोविड-१९ मुळे लागू करण्यात आलेली देशव्यापी टाळेबंदीमुळे शुल्क भरण्यास येणाऱ्या अडचणी, आर्थिक समस्येचा करावा लागणारा सामना तसेच सर्व अर्जदार हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असणे, या बाबींचा विचार करून यापूर्वीच सदनिकांचे हफ्ते भरण्यास ३० जून २०२० व त्यानंतर २९ सप्टेंबर २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर सदनिकांचे हफ्ते भरण्यास सिडकोतर्फे अर्जदारांना पुनःश्च २८ डिसेंबर २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सिडकोतर्फे पुन्हा एकदा देण्यात आलेल्या या संधीमुळे अंदाजे २००० कुटुंबियांचे घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

या मुदतवाढीच्या निर्णयानुसार ज्या अर्जदारांनी वाटपपत्रात नमूद एक ते चार हफ्त्यांपैकी कोणत्याही हफ्त्याची रक्कम भरली असेल अशा अर्जदारांना २८ डिसेंबर २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येऊन टाळेबंदीच्या सुरुवातीपासून दि. २४ मार्च २०२० ते दि. २८ डिसेंबर २०२० पर्यंत विलंब शुल्क माफ करण्यात आले आहे. ज्या अर्जदारांनी यापूर्वीच वाटपपत्रात नमूद एक ते चार हफ्त्यांची पूर्ण रक्कम भरली असेल व टाळेबंदीच्या कालावधीमध्ये ज्यांना पाचवा व सहावा हफ्ता भरणे शक्य झाले नसेल, अशा अर्जदारांनादेखील २८ डिसेंबर २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून त्यावर कोणतेही विलंब शुल्क आकारण्यात येणार नाही.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी, सिडको**